डोणगावात शिवमय वातावरण; शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन >> पान 2

गॅस दरवाढीविरोधात जिल्हा काँग्रेसचे आंदोलन; दर कमी करण्याची मागणी >> पान 3

लोणार सरोवर आणि जिजाऊ जन्मस्थळाला केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत देणार भेट >> पान 4

**सुविचार**

व्यवहारात आपण दुसऱ्याची लबाडी ओळखून वागावे, एवढीच लबाडी आपल्यामध्ये असावी. - अज्ञात


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 213 ■ शुक्रवार, दि. 13 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




इराण-इस्रायल युद्धाचा परिणाम, दीपिका पदुकोणचा पॅरिसमधील कार्यक्रम चुकला

आतील पान

# युद्ध जिंकल्याची टिमकी ट्रम्प वाजवत असतानाच, अमेरिका आणि ग्रीसची दोन तेलवाहू जहाजे इराणने उडवली! एका हिंदुस्थानीचा मृत्यू

**तेहराण/वृत्तसंस्था :** इराणविरुद्धचे युद्ध आम्ही जिंकल्याची टिमकी डोनाल्ड ट्रम्प वाजवत असतानाच इराणने आज अमेरिकेला जबर हादरा दिला. होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडण्याचा प्रयत्न करणारी दोन तेलवाहू जहाजे इराणच्या सुसाईड बोटींनी उडवून दिली. यात एक अमेरिकेचे, तर एक ग्रीसचे जहाज आहे. या दोन्ही जहाजांवरील हल्ल्यात एका हिंदुस्थानीचा मृत्यू झाला असून २५ खलाशांना वाचवण्यात यश आले आहे.

सेफसी विष्णू आणि झेफीरॉस अशी हल्ला झालेल्या जहाजांची नावे आहेत. इराक बंदरावर इंधन भरून ही जहाजे प्रवासाला निघाली होती. होर्मुझ सामुद्रधुनीच्या हद्दीत असताना इराणने स्फोटकांनी भरलेल्या बोटी धडकवून त्यांच्यावर हल्ला केला. त्यानंतर जहाजावर आगडोंब उसळला. इराकी पोर्ट्स कंपनीच्या बोटींनी पेटत्या जहाजावरून २५ खलाशांची सुटका केली. बेपत्ता खलाशांचा शोध सुरू



आहे.

**१५ हिंदुस्थानी बचावले**

इराणने हल्ला केलेल्या सेफसी विष्णू या जहाजावरील एका खलाशाचा मृत्यू झाला, तर, १५ खलाशांना सुखरूप वाचवण्यात यश आले. बगदादमधील हिंदुस्थानी दूतावासाने ही माहिती दिली. हल्ल्यानंतर इराकमधील तेलाची बंदरे व्यापारासाठी पूर्णपणे बंद करण्यात आली आहेत.

**इराणचा इस्रायलवर चौथा मोठा हल्ला**

हिजबुल्लाच्या मदतीने इस्रायवर सलग पाच तास हल्ले केल्यानंतर इराणने आज इस्रायलवर चौथा सर्वात मोठा बॅलिस्टिक मिसाइल हल्ला चढवला. जेरुसलेम आणि तेल अवीव येथील हवाई तळ आणि इस्रायलची सुरक्षा संस्था शीन बेटच्या कार्यालयांना लक्ष्य करून इराणने मिसाइल डागली. यात १०० हून अधिक इस्रायली जखमी झाले आहेत.

**सिनेगॉगवर कारहल्ला**

मिशिगनमध्ये एका अज्ञाताने टेम्पल इस्रायल या ज्यू सिनेगॉगला कारची धडक देऊन गोळीबार केल्याची घटना घडली आहे. हा हल्ला ठरवून केल्याचा दाट संशय तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**हिंदुस्थानला होर्मुझ बंदीच**

हिंदुस्थानी जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीतून वाहतूक करण्यासाठी इराणने सवलत दिल्याचे वृत्त इराणने फ टाळले. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर व इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांच्यात झालेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर हे वृत्त पसरले होते.

**मोदी इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी बोलले**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेझेश्कियान यांच्याशी गुरुवारी फोनवरून चर्चा केली. मोदींनी मध्य पूर्वेतील वाढता तणाव, नागरिकांचे बळी आणि नागरी पायाभूत सुविधांचे नुकसान याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. हिंदुस्थानी नागरिकांची सुरक्षा, उर्जा आणि वस्तूंची अखंड वाहतूक या सर्वोच्च प्राधान्य असल्याचे मोदींनी सांगितले.

**मोजतबा खामेनी यांची अमेरिकेला धमकी**

इराणच्या सर्वोच्च पदी निवड झालेले मोजतबा खामेनी यांनी आज पहिल्यांदाच जाहीर वक्तव्य केले. अमेरिकेवर त्यांनी कठोर प्रहार केला. निरपराध नागरिकांच्या बलिदानाचा बदला इराण घेईल आणि होर्मुझची सामुद्रधुनी बंदच राहील, असे त्यांनी ठणकावले. आखातातील अमेरिकेचे सर्व लष्करी तळ तातडीने बंद झाले पाहिजेत, नाहीतर तिथे हल्ले केले जातील, अशी धमकीही त्यांनी दिली.

**अमेरिकेवर हल्ल्याची शक्यता नाही!**

इराण कॅलिफोर्नियावर ड्रोन हल्ले करु शकतो, असा इशारा एफबीआयने दिला होता. मात्र, असा कोणताही धोका नाही, असे व्हाईट हाऊसने स्पष्ट केले.

**युद्ध थांबवण्यासाठी इराणच्या तीन अटी**

युद्धाची सुरुवात तुम्ही केली, शेवट आम्ही करणार आणि तोही आमच्या अटींवर करणार, असे सांगत इराणचे अध्यक्ष मसूद पेजेश्कियान यांनी आज युद्ध थांबवण्यासाठी अमेरिका आणि इस्रायलला तीन अटी घातल्या. आमचे कायदेशीर अधिकार मान्य करा, युद्धामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई द्या आणि भविष्यात असे हल्ले करणार नाही अशी हमी जगाच्या साक्षीने द्या, असे त्यांनी नमूद केले.

## जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्लांच्या हत्येचा प्रयत्न



जम्मू : नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष आणि जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्यावर बुधवारी रात्री एका व्यक्तीने गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. पण सुरक्षारक्षकांच्या सतर्कतेमुळे हल्लेखोर लगेच पकडला गेला. फारुख अब्दुल्ला सुरक्षित आहे. त्यांना काहीही इजा झाली नाही.जम्मूत एका लग्न सोहळ्याला फारुख अब्दुल्ला उपस्थित होते. त्यांच्यासोबत राज्याचे उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी देखील होते. नेमका त्याचवेळी हल्ला झाला. या हल्ल्यात सुरिंदर चौधरी किरकोळ जखमी झाले. घटनेचे सीसीटीव्ही फूटेज समोर आले आहे.समोर आलेल्या सीसीटीव्ही फूटेजमध्ये हल्लेखोर कमल सिंग जामवाल मागून येत फारुख अब्दुल्ला यांच्या डोक्यावर बंदूक रोखताना दिसत आहे. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी ताबडतोब हल्लेखोराला पकडले. त्यावेळी हल्लेखोराने स्वत:ची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी तसेच दहशत पसरवण्यासाठी हवेत गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. पण सुरक्षा रक्षकांनी त्याची डाळ शिजू दिली नाही. फारुख अब्दुल्ला यांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. हल्लेखोराला अटक करण्यात आली. या प्रकरणी तपास सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि फारुख अब्दुल्लांचे पुत्र ओमर अब्दुल्ला यांनी हल्ल्याचा प्रयत्न झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.




## खेळाडूंना ५% आरक्षणासाठी 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणाली कार्यन्वित

### २४ तासांत डिजिटल पडताळणी प्रमाणपत्र

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी 'क्रीडा ई-प्रमाण' ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली सुरू केली असल्याची माहिती क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविली आहे.

सदर प्रणालीद्वारे खेळाडूंना डिजिटल पडताळणीसह प्रमाणपत्र मिळणार आहे. यावर असलेल्या QR कोडमुळे प्रमाणपत्राची सत्यता संबंधित नियुक्ती प्राधिकरण त्वरित तपासू शकतील. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंनी 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे.

खेळाडूंनी https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' प्राप्त करुन घ्यावे, त्याचप्रमाणे जर एखाद्या खेळाडूची माहिती प्रणालीवर उपलब्ध नसल्यास supportkridaepramaan.org या ई-मेलवर स्पर्धेचे नाव, वर्ष आणि प्रमाणपत्राची स्कॅन प्रत पाठवून तक्रार नोंदवता येईल. त्यानंतर विभागस्तरावर पडताळणी करून अभिलेख पोर्टलवर अद्ययावत करण्यात येतील.

सध्यस्थितीत कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५), ज्युडो (२०२४) आणि कुराश (२०२४-२५ व २०१७-१८) या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध असून संबंधित खेळाडूंनी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा. इतर खेळांचे अभिलेखही टप्प्याटप्प्याने अपलोड करण्याचे काम सुरू आहे.

यापूर्वी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्रमाणपत्रांची पडताळणी केलेल्या खेळाडूंनी देखील पुढील भरती प्रक्रियेसाठी या प्रणालीद्वारे डिजिटल प्रमाणपत्र तयार करून घेणे आवश्यक असल्याचे आवाहन क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने केले आहे.

## पर्यावरण संरक्षणासाठी जीवनशैलीत बदल आवश्यक - राज्यमंत्री जयस्वाल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विकास आणि पर्यावरण संरक्षण यामध्ये संतुलन राखणे ही काळाची गरज आहे. समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या जीवनशैलीत बदल करणे आवश्यक असल्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधान परिषदेत सांगितले.



नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चेत सदस्य अमोल मिटकरी यांनी याबाबत सूचना उपस्थित केली होती.

राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, विकासाच्या प्रक्रियेत सिमेंट-काँक्रीटची घरे, रस्ते आणि नवीन बांधकाम थांबवता येणार नाही. मात्र त्याचवेळी जलप्रदूषण, वायुप्रदूषण आणि ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती आवश्यक आहे. शालेय शिक्षणापासूनच पर्यावरण विषय अनिवार्य करून विद्यार्थ्यांमध्ये योग्य संस्कार घडवण्याची गरज आहे. ग्रामीण भागात कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनत असून प्लास्टिकचा वाढता वापर चिंताजनक आहे. धार्मिक कार्यक्रम, लग्नसमारंभ आणि दैनंदिन वापरात प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे.

राज्य सरकारने पर्यावरण संरक्षणासाठी अनेक निर्णय घेतले असून ३०० कोटी वृक्षलागवडीचा संकल्प करण्यात आला आहे. तसेच नैसर्गिक वाळूच्या वापराला पर्याय म्हणून कृत्रिम वाळू वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बांबू लागवडीवर आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी ५० हजार कोटी रुपयांचे धोरणही सरकारने जाहीर केले आहे.

शेती क्षेत्रात शेडनेट, पॉलिहाऊस, कंट्रोल फार्मिंग आणि व्हर्टिकल फार्मिंगसारख्या आधुनिक पद्धतींना प्रोत्साहन दिले जात आहे. नैसर्गिक शेती अभियानालाही राज्य सरकार प्राधान्य देत असून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविल्या जात असल्याचेही जयस्वाल यांनी यावेळी सांगितले.

# नापास झालात तर थेट इस्त्रायलविरुद्ध युद्धात

## इराणच्या लाखो तरुणांना प्रवेश परीक्षेमुळे भरलीय धडकी!

**तेहरान/वृत्तसंस्था :** इराणमध्ये सध्या युद्धाचे वातावरण आहे, पण तेथील लाखो युवकांना एका परीक्षेचा मोठा धोका वाटतो. ही परीक्षा म्हणजे 'कोंकुर', जी जगातील सर्वात कठीण प्रवेश परीक्षा मानली जाते. यात अपयशी झाल्यास डॉक्टर किंवा अभियंता होण्याचे स्वप्न भंगते आणि थेट सैन्यात भरती होण्याची सक्ती येते. मार्च २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, इराण-इस्रायल युद्धामुळे या परीक्षेचा तणाव आणखी वाढलाय. तरुण बंकरमध्ये अभ्यास करताना दिसतायत.

इराणची 'कोंकुर' ही राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा आहे. ती युनिवर्सिटीमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी घेतली जाते. ही परीक्षा जगातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक आहे. यात विज्ञान, फारसी साहित्य, अरबी भाषा आणि धार्मिक अभ्यास यांचा समावेश असतो. परीक्षा साडे चार तास चालते, ज्यात ब्रेक नसतो. इराणमध्ये चांगली रँक मिळाली नाही तर चांगल्या करियरची संधी हुकते. ही परीक्षा युवकांसाठी भविष्याचा निर्णय घेणारी असते.इराणच्या युवकांना या परीक्षेचा मोठा धोका वाटतो कारण अपयशी झाल्यास



थेट सैन्यात भरती होण्याची सक्ती येते. सध्या युद्ध चालू असल्याने हे भय दुप्पट झाले आहे. परीक्षेत पास होऊन युनिवर्सिटीमध्ये गेल्यास सैन्य सेवा टाळता येते. पण अपयशी झाल्यास सीमेवर लढाई करावी लागते. लाखो युवक या तणावात आहेत, कारण परीक्षा म्हणजे केवळ अभ्यास नव्हे तर जीवन-मृत्यूचा प्रश्न आहे.

**सैन्य सेवेची सक्ती**

इराणच्या कायद्यानुसार, १८ वर्षांच्या प्रत्येक मुलाला दीड ते २ वर्षांची सैन्य सेवा अनिवार्य आहे. ही सेवा टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे युनिवर्सिटीमध्ये शिक्षण घेणे. म्हणून 'कोंकुर' ही परीक्षा युवकांसाठी 'सुरक्षा कवच' आहे. पास झाल्यास शिक्षण आणि अपयशी झाल्यास सैन्यात भरती. युद्धाच्या पार्श्वभूमीवर ही सक्ती अधिक भयावह झाली आहे, कारण सीमेवर धोका वाढला आहे.

**युद्धाचा परीक्षेवर काय परिणाम?**

मार्च २०२६ मध्ये इराण-इस्रायल युद्धामुळे तेहरान आणि इस्फहानसारख्या शहरांत बॉम्बस्फोट होत आहेत. शाळा-कॉलेज बंद आहेत. युवक लायब्ररीऐवजी बंकर आणि बेसमेंटमध्ये अभ्यास करत आहेत. इंटरनेट बंद असल्याने ऑनलाइन कोचिंग थांबलीय. युद्धामुळे परीक्षा केंद्रे बंकरजवळ हलवण्याची चर्चा आहे. सीबीएसईनेही खाडी देशांत परीक्षा पुढे ढकलल्या आहेत.

**भारतीय परीक्षांशी तुलना**

भारतातील जेईई आणि नीट परीक्षा ३ तासांच्या असतात, पण 'कोंकुर' साडे चार तासांची आहे. याचा अभ्यासक्रम अधिक कठीण आहे, ज्यात धार्मिक आणि भाषिक विषयही आहेत. भारतात प्रायव्हेट कॉलेजचा पर्याय असतो, पण ईरानमध्ये नाही. म्हणून अपयशी झाल्यास करियर संपुष्टात येते आणि सैन्यात जावे लागते. ही परीक्षा भारतीय परीक्षांपेक्षा अधिक दबावपूर्ण आहे.

**परीक्षेची तयारी**

युवकांना युद्धाच्या मधोमध अभ्यास करावा लागतो. आकाशातून मिसाईल पडत असताना अभ्यास करणे कठीण आहे. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी कठोर मेहनत आवश्यक आहे. पण सध्याच्या परिस्थितीत इंटरनेट आणि शैक्षणिक सुविधा बंद असल्याने तयारी अडचणीत आहे. लाखो युवक या परीक्षेसाठी तयार होत आहेत, पण युद्धाने सर्व गणित बिघडले आहे.

**परीक्षेचे वेळापत्रक**


इराणमध्ये 'कोंकुर' वर्षातून दोनदा घेतली जाते. पहिला टप्पा मे/जून (ईरानी कॅलेंडरनुसार 'ओर्डिबेहेश्ट') मध्ये आणि मुख्य परीक्षा जुलाईत होते. पण २०२६ मध्ये युद्धामुळे वेळापत्रकात विलंब होण्याची शक्यता आहे. 'नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर एज्युकेशनल टेस्टिंग' (संजेश) ने परीक्षा उशिरा होण्याचे संकेत दिले आहेत. एअरस्पेस बंद असल्याने केंद्रे बदलण्याची चर्चा आहे.

## आर्थिक संकटाची चाहूल

सध्या सुरु असलेल्या युद्धाचा भारतावर विसी आर्थिक परिणाम व्हायला सुरवात झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचा भाव प्रति बैरल ११० डॉलरवर गेला आहे. सुमारे आठ दिवसांत हा भाव दुपटीने वाढला आहे. त्यामुळे मोठ्या इंधन दरवादीचे संकट तर आहेच पण त्याचबरोबर इंधनाच्या उपलब्धतेचेही मोठे संकट देशावर पोंगावत आहे. वा मुद्धाचे अन्नही आर्थिक दुष्परिणाम दिसू लागले असून शेअर बाजारात तर कार अक्षरशः उडाल्यासारखी स्थिती आहे. गेल्या सुमारे दहा दिवसांत आ बाजार आत टक्क्यांत अधिक कोसळला. आज एका दिवसात तो साधारणपणे १८०० ते २००० अंकांनी कोल्याच्या स्थितीत होता. या सगळ्या पडझडीत गुंतवणूकदारांचे गेल्या काही दिवसांत जवळपास २० लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. या यामुळे जागतिक वा माखलीमुद्धा कोलमडून पडली असून त्याचेही अन्य दुष्परिणाम भारताला भोगावे लागणार आहेत. सगळ्यात मोठे संकट इंधनाचे आहे. आखाती देशातून होणारा इंचनपुरवठा विस्कळीत झाल्याने त्याचे दर ११० डॉतरच्या पातळीवर गेले असून ते या पुढील काळात आणखी किती बाढणार आहेत याचा अंदाज कोणीही लावू शकत नाही. आता इतक्या मोठ्या दराने तेल विकत घेऊन ते भारतीय ग्राहकांना सध्याच्या भावाच्या पातळीत पुरवणे सरकारला शक्य होणार नसल्याने इथन दरवाह अटळ आहे हेही सगळे गृहीत धरून चालले आहेत. कालच घरगुती स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात ६० रुपयांनी वाढ झाली. त्याखेरीज गॅस सिलेंडर उपलब्धतेची मर्यादाही कमी करण्यात आत्ती असून आता महिन्याला फक्त एकच सिलेंडर मिल्छ शकेल आणि त्याशिवाय एकदा गैस सिलेंडर बुक केल्यानंतर किमान ३० दिवस बुढ़वा गॅस सिलेंडर नोंदवता येणार नाही अशीही नवीन नियमावली लागू करण्यात येत आहे. केंद्र सरकारने सांया उक्तव्य असलेला गैस केवळ घरगुती हांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला असून उद्योगांसाठी होणारा एलपीजी गैस पुरवठा अत्यंत मर्यादित किंवा जवळपास बंद करत आणला आहे. कव्या तेलाच्या बाबतीत स्थिती अशी आहे की करी आपल्याला आखातातून कच्चे तेल आयात करामता अडचण आली तरी रशियाकडून तेल जायातीला आपल्याला अनुमती मिळाली आहे, अर्थात अनुमती ३० दिवसांसाठी आहे जाणि रशियाची जी बहाजे तेल घेऊन अंऑलरेडी समुद्रात उभी आहेत त्यांच्याकडूनच लापल्याला हे तेल घ्यावे लागणार आहे. त्यामुळे एक बाथ सोयीची झाली आहे की आपल्याला तेलाची कमतरता भासणार नाही, पण दद्यमा आणखी एक असा धोका आहे की रशिया आपल्याला आता पूर्वीसारखे स्वस्त दरात हे तेल देणार आहे की नाही हा मुद्दा महत्वाचा आहे. कारण भारत, अमेरिकेने दिलेल्या परवानगीनुसार रशियाकडून है तेल आयात करीत असल्याने रशियायुद्धा आता व्यापारी सूचीने आपाते हात धुऊन घेण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे आपल्याला है रशियन तेल आंतरराष्ट्रीय दरानेव घ्यावे लागण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे इंधन महागाईसुद्धा उता अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे. या सगळ्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी केंद्र सरकारकडे नेमकी काय उपाययोजना आहे याचे आकलन झालेले नाही. आज संदे कामकाज सुरू झाल्यानंतर या सगया विषयावर सविस्तर तातडीची चचर्चा च्या अशी मागणी करत विरोधी पक्षाने लोकसभेत गोंधळ घातला, पण सरकारने या विशेष चर्चेला अनुमती देण्याऐवजी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांना या स्थितीबाबत संसदेच्या दोन्ही सभागृहात निवेदन करायला सांगितले. जयशंकर यांनी टिपरीमटिका पद्धतीचे निवेदन करून, सरकारचे या सगळ्या परिस्थितीवर लक्ष आहे आणि देशातील ग्राहकांना इंधनपुरवठा करण्याला आमची प्राथमिकता आहे असे मोघम उहर देऊन वेळ मारून नेली पण त्यातून कोणाचेही समाधान झालेले नाही. सगळ्यात महत्वाचा मुद्दा हा आहे की, कच्च्या तेलाचा दर ११० डॉलरच्या पुढे गेल्यानंतर सरकार त्याच प्रमाणात आता पेट्रोल, डीझेलच्या किमती वाढवणार की सध्याच्याच दराने ग्राहकांना हे इन पुरवणार हे पाहणे महत्वाचे आहे. केव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर अगदी कमी झाले होते त्यावेळी त्याचा लाभ ग्राहकांना होऊ न देता सरकारने त्यावर वेगवेगळ्या टप्प्यात उत्पादनशुल्कात वाढ करून ग्राहकांना मिळणारा लाभ पाम्पर काढून घेतला होता. आता महागड्या दराने तेल खरेदी करावे लागत आहे अशी सबब सांगून आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या देशातील जनतेला केंद्र सरकारने आणखी अडवणीत आणू नये. त्याऐवजी मयल्या काळात जी उत्पादनशुल्क वाढ केली होती ती कामी करून पेट्रोल डीझेलचे दर स्थिर ठेवावेत अशीच देशातील जनतेची मागणी असणार कारण चारही बाजूने सुरू असलेली महागाईची होरपळ सहन करने आता जनतेच्या आवाक्याच्या बाहेर जाऊ लागले आहे. त्यामुळे इंधन दरवाढीच्या झळा सर्वसामान्यांना सोसाव्या लागू नयेत याची काळजी सरकारने यायला हवी. बाकी एकूण आर्थिक संकट पेड पाहत आहे त्याबाबतही सरकारने आता विरोधकांनाही विश्वासात घेऊन जवाबदारीचे दर्शन घडवणे आवश्यक आहे.

# डोणगावात शिवमय वातावरण; शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन

➤ सुशोभीकरणासाठी २५ लाखांचा निधी जाहीर
➤ ऋषी जाधव यांच्या हस्ते दुग्धाभिषेक व आरती;
➤ केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या वतीने निधीची घोषणा





ऋषी जाधव यांच्या नेतृत्वाचे उपस्थित युवकांनी तोंडभरून कौतुक केले. युवकांमध्ये लोकप्रिय ठरलेले हे नेतृत्व समाजात प्रेरणा निर्माण करत असल्याचेही यावेळी दिसून आले. या पूजन सोहळ्यामुळे डोणगावात शिवचैतन्य निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अत्यंत भक्तीभावाने पूजन करत शिवमय वातावरण अनुभवायला मिळाले. युवा शिवसेनेचे नेते ऋषी प्रतापराव जाधव यांच्या हस्ते पुतळ्याचा दुग्धाभिषेक, टिळक आणि आरती करण्यात आली. “जय शिवराय” च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि उपस्थित शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करून करण्यात आली. त्यानंतर महाराजांच्या प्रतिमेला टिळक लावून पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच आरती करण्यात आली. या प्रसंगी मोठ्या संख्येने युवक, शिवभक्त आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना ऋषी जाधव यांनी केंद्रीय मंत्री तसेच बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या परिसराच्या सुशोभीकरणासाठी २५ लाख रुपयांच्या निधीची घोषणा केली. या घोषणेनंतर उपस्थित युवक आणि नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात आनंद व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार केवळ डोक्यावर न ठेवता डोक्यात घेऊन त्यांच्या आदर्शांनुसार समाजकार्यात कार्य करणे हीच खरी महाराजांना अभिवादन करण्याची पद्धत आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच युवकांच्या सुख-दुःखात नेहमी खंबीरपणे उभे राहण्याचा विश्वासही त्यांनी यावेळी दिला.

# प्रियांका चोप्रा आणि निक जोनासवर दुःखाचा डोंगर! जवळच्या व्यक्तीला गमावलं

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड आणि हॉलिवूडची अभिनेत्री प्रियांका चोप्रा जोनास आणि त्यांच्या सासरच्या कुटुंबावर दुःखाची छाया पसरली आहे. हॉलिवूडचा लोकप्रिय गायक आणि प्रियांका चोप्राचा पती, निक जोनासच्या कुटुंबातील जवळच्या व्यक्तीचं निधन झालं आहे. निकच्या अत्यंत जवळच्या मैत्रिणी आणि जिच्यावर त्याने हक्कानं आपली बहीण मानली होती, माया किबेल हिने ७ मार्च रोजी अखेरचा श्वास घेतला. मया गेल्या अनेक दिवसांपासून दुमिळ आजाराशी झुंज देत होती आणि या लढाईत ती अखेर अपयशी ठरली.

माहितीनुसार, माया किबेलला 'विल्सन डिसीज' नावाचा दुमिळ अनुवांशिक आजार होता. या आजारामुळे शरीरात तांब्याचे प्रमाण वाढते, ज्याचा यकृत आणि मेंदूवर गंभीर परिणाम होतो. माया किबेलच्या आईने सोशल मीडियावर एक भावूक पोस्ट शेअर केली असून, ७ मार्च रोजी सकाळी माया अचानक बेशुद्ध पडल्याचे सांगितले. रुग्णालयात उपचारादरम्यान तिचं हृदय आणि फुफ्फुस निकामी झाले, ज्यामुळे तिचं निधन झाले.

निक जोनासने सोशल मीडियावर माया किबेलच्या आईच्या पोस्टवर कमेंट करत दुःख व्यक्त केलं. त्यांनी लिहिलं, ''माझी बहीण. मी तुझ्यासाठी नेहमीच इथं आहे.'' निक आणि माया शेजारी राहत होते आणि त्यांचे बालपण एकत्र गेले होते. जोनास कुटुंबातील प्रत्येक कार्यक्रमात माया उपस्थित राहायची, आणि निक, जो, आणि केविन या तिन्ही भावांशी तिचा घनिष्ठ संबंध होता.

माया किबेलच्या निधनानंतर सोशल मीडियावर चाहत्यांनी हळहळ व्यक्त केली आहे. निक आणि माया यांचे बालपणातील अनेक फोटो सध्या इंटरनेटवर व्हायरल होत आहेत.

प्रियांका चोप्राने देखील या दुःखद घटनेवर आपलं दुःख व्यक्त केल्याचं समजतं. चाहत्यांनी ट्विट आणि इन्स्टाग्रामवर कमेंट्सद्वारे निक आणि प्रियांका यांना आधार दिला आहे. निक जोनासच्या व्यावसायिक कामाबद्दल बोलायचं झालं तर, त्यांनी ६ फेब्रुवारी २०२६ रोजी आपला पाचवा सोलो स्टुडिओ अल्बम 'संडे बेस्ट' प्रदर्शित केला. २०२१ मधील 'स्पेसमन' नंतर हा त्याचा पहिला मोठा सोलो प्रोजेक्ट ठरला आहे. अल्बममधील 'उलू इल्हम्प' हे गाणं १ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित झाले, ज्याला चाहत्यांकडून मोठी पसंती मिळाली. या गाण्याने फॅन्समध्ये नवीन उत्साह निर्माण केला आहे.

यासोबतच, निक आता पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाला आहे. तो 'बॉडीमॅन' या ॲक्शन-थ्रिलर चित्रपटात मुख्य भूमिका साकारणार आहे. चित्रपटाचे शूटिंग लवकरच सुरु होणार असून, प्रेक्षकांना त्याच्या आगामी कामाची उत्सुकता आहे. निकच्या या व्यस्त व्यावसायिक आयुष्यात, वैयक्तिक दुःखही त्याच्यावर खोल परिणाम करत आहे.

निक, प्रियांका आणि त्यांच्या कुटुंबाने माया किबेलच्या आठवणींना जिवंत ठेवण्याचे ठरवले असून, चाहत्यांनी देखील त्यांना या दुःखात आधार दिला आहे.

# फिफा २०२६ च्या विश्वचषकातून इराण बाहेर; फिफाने ठोठावला इराणला दंड

तेहरान : अमेरिकेने इस्त्रायलसोबत हवाई हल्ले करून अयातुल्ला अली खामेनी यांची हत्या केल्यानंतर इराण २०२६ च्या विश्वचषकात सहभागी होऊ शकत नाही, असे इराणचे क्रीडामंत्री अहमद डोन्यामाली यांनी सांगितले. अमेरिका आणि इस्त्रायलने जवळजवळ दोन आठवड्यांपूर्वी इराणवर हवाई हल्ले करून इस्लामिक रिपब्लिकचे सर्वोच्च नेते मारले, ज्यामुळे आखातात प्रदेशव्यापी संघर्ष निर्माण झाला आहे. ''या भ्रष्ट राजवटीने आमच्या नेत्याची हत्या केली आहे हे लक्षात घेता, कोणत्याही परिस्थितीत आम्ही विश्वचषकात सहभागी होऊ शकत नाही,'' असे मंत्र्यांनी सांगितले. ४८ संघांचा सहभाग असलेला फुटबॉल विश्वचषक ११ जून ते १९ जुलै दरम्यान अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा येथे होणार आहे.आपली मुले सुरक्षित नाहीत आणि मूलभूतपणे, सहभागासाठी अशा परिस्थिती अस्तित्वात नाहीत,'' असे डोन्यामाली म्हणाले.''इराणविरुद्ध केलेल्या दुर्भावनापूर्ण कृत्यांमुळे, त्यांनी आठ किंवा नऊ महिन्यांत आपल्यावर दोन युद्धे लादली आहेत आणि आपले हजारो नागरिक मारले आहेत. म्हणून, आपण निश्चितच अशी उपस्थिती ठेवू शकत नाही.'' गेल्या २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्त्रायली हवाई हल्ले सुरू झाल्यापासून १,३०० हून अधिक इराणी नागरिकांचा मृत्यू झाला आहे, असे इराणचे संयुक्त राष्ट्रांचे राजदूत अमीर सईद इरावनी यांनी सांगितले. गेल्या डिसेंबरमध्ये झालेल्या ड्रॉमध्ये इराणी संघाचा समावेश बेल्जियम, इजिप्त आणि न्यूझीलंडसह करण्यात आला होता. त्यांचे तीनही गट जी सामने अमेरिकेत, दोन लॉस एंजेलिसमध्ये आणि एक सिएटलमध्ये होणार होते. गेल्या वर्षी मार्चमध्ये स्पर्धेसाठी पात्र होण्यासाठी आशियाई पात्रता फेरीत वर्चस्व गाजवणारा इराण हा अटलांटामध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या विश्वचषक सहभागींसाठीच्या फिफा नियोजन शिखर परिषदेतून अनुपस्थित असलेला एकमेव देश होता.विश्वचषक स्पर्धेसाठी फिफाच्या नियमांनुसार, ''पहिल्या सामन्याच्या ३० दिवस आधी'' स्पर्धेतून माघार घेणाऱ्या कोणत्याही संघाला किमान दंड आकारला जाईल.

# एसटीच्या जागांचा पीपीपी तत्त्वावर विकास; प्रवाशांना आधुनिक सुविधा व स्थानिकांना रोजगार मिळणार, प्रताप सरनाईकांची माहिती

**दैनिक आपला विदर्भ**


**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) ताब्यातील अतिरिक्त व मोकळ्या जागांचा अधिक परिणामकारक वापर करून महसूल वाढविणे, प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती साध्य करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या विषयावर महाराष्ट्र विधानपरिषदेत अर्धा तास चर्चेची सूचना देण्यात आली होती. त्यासंदर्भातील सविस्तर माहिती शासनाने सभागृहात मांडली आहे.

परिवहन मंत्री तथा एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मालकीच्या सुमारे १५०० हेक्टरहून अधिक जमिनी राज्यभर विविध आगार व बसस्थानक परिसरात उपलब्ध आहेत. या जमिनींचा नियोजनबद्ध विकास करून महसूलवाढ साधण्यासाठी शासनाने त्या सार्वजनिक -खाजगी- सहभाग तत्त्वावर खासगी विकासकांना देण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. या अंतर्गत संबंधित जागा ९८ वर्षांच्या भाडेकरारावर देऊन त्यांचा पुनर्विकास करण्याची योजना आहे.

४८२ ठिकाणी जवळपास २ हजार ३६० हेक्टर जमीन विकासासाठी उपलब्ध-

राज्यात सध्या एस.टी. महामंडळाचे २५१ डेपो आणि ५८१ बसस्थानके कार्यरत असून राज्यातील सुमारे ४८२ ठिकाणी जवळपास २ हजार ३६० हेक्टर जमीन विकासासाठी उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे. या जागांचा विकास करण्यासाठी यापूर्वी २०१७ मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे ती प्रक्रिया पुढे सरकू शकली नव्हती. त्यानंतर या संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या उच्चाधिकार समितीच्या शिफारशींनुसार सुधारित धोरण तयार करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात काही प्रमुख ठिकाणांसाठी नव्याने निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुणे यांसारख्या प्रमुख शहरांमधील एस.टी.च्या जागांचा विकास टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. या ठिकाणी बसस्थानकांचे आधुनिकीकरण, व्यापारी संकुले, कार्यालयीन इमारती तसेच प्रवाशांसाठी विविध आधुनिक सुविधा उभारण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी सार्वजनिक-खाजगी-सहभाग (इझ्झ) तत्त्वावर प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. शासनाने यासंदर्भात सुधारित धोरणास मान्यता देत भाडेकराराचा कालावधी ३० वर्षांऐवजी



६० वर्षांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र व्यावसायिक तत्त्वावर विकास प्रकल्पांसाठी प्रत्यक्ष भाडेकरार ४९+४९ वर्षे म्हणजे एकूण ९८ वर्षे असा ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांना प्रकल्प राबविण्यास प्रोत्साहन मिळेल आणि एस.टी. महामंडळालाही दीर्घकालीन आर्थिक लाभ मिळेल. या प्रकल्पासाठी तज्ज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे पॅनेल तयार करण्यात आले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावित जागांचे 'क्लस्टर पॅकेज' तयार करण्यात येत आहे. आर्थिक व्यवहार्यतेनुसार 'अ', 'ब' आणि 'क' श्रेणीतील जागांचा (म्हणजे जिल्हा, तालुका व गाव स्तरावरील) समावेश करून पहिल्या टप्प्यात ७२ प्रकल्पांद्वारे २१६ ठिकाणांचा विकास पीपीपी तत्त्वावर करण्याचा प्रस्ताव आहे.

महामंडळाची आर्थिक स्थिती बळकट करणे हे शासनाचे ध्येय- प्रताप सरनाईक

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, या विकासामुळे बसस्थानके आणि आगारांमध्ये आधुनिक सुविधा, नवीन इमारती, व्यापारी गाळे आणि सेवा केंद्रे उभारली जातील. त्यामुळे एस.टी. महामंडळाला नियमित उत्पन्न मिळेल आणि प्रवाशांनाही स्वच्छ, सुरक्षित व आधुनिक सुविधा उपलब्ध होतील. तसेच या प्रकल्पांमधून स्थानिक युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार व व्यवसायाच्या संधी निर्माण होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. केंद्र व राज्य शासनाच्या कार्यालयांसाठी आवश्यक असल्यास काही जागा उपलब्ध करून देण्याचाही पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. विकसित होणाऱ्या बसस्थानक परिसरात व्यापारी आणि सेवा क्षेत्रातील विविध उपक्रम सुरू होणार असल्याने त्या भागाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. ''एस.टी. महामंडळाची जमीन ही राज्याची महत्त्वाची मालमत्ता आहे. तिचा योग्य वापर करून प्रवाशांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देणे आणि महामंडळाची आर्थिक स्थिती बळकट करणे हे शासनाचे ध्येय आहे,'' असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### मुंबईतील उंच इमारतींसाठी अग्निसुरक्षा व्यवस्था सक्षम करण्यात येणार- मंत्री उदय सामंत

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईमध्ये वाढत्या उंच इमारतींच्या पार्श्र्वभूमीवर अग्निसुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले.

नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चेत सदस्य प्रविण दरेकर यांनी याबाबत सूचना उपस्थित केली होती.

मंत्री उदय सामंत म्हणाले, उंच इमारतींमध्ये आधुनिक अग्निसुरक्षा प्रणाली अनिवार्य करण्यात आली असून त्यामध्ये फायर स्टेअरकेस, फायर लिफ्ट, स्प्रिंकलर प्रणाली, अलार्म व्यवस्था आणि फायर एस्केपसारख्या सुविधा समाविष्ट असतात. या सर्व उपाययोजना पूर्ण झाल्यानंतरच महानगरपालिका आणि अग्निशमन दलाकडून इमारतींना अंतिम परवानगी दिली जाते.

मुंबई अग्निशमन दलाकडे सध्या ९४ फूट उंचीपर्यंतची शिडी उपलब्ध आहे. मात्र, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरासाठी अधिक उंच आणि अत्याधुनिक शिडीची आवश्यकता लक्षात घेऊन महानगरपालिकेला योग्य त्या सूचना दिल्या जातील. देशातील सध्या सर्वाधिक उंच १०४ मीटरची शिडी चेन्नईमध्ये उपलब्ध असून त्यापेक्षा अधिक प्रगत तंत्रज्ञानाची शिडी मुंबईत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर असल्यामुळे अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. उंच इमारतींमध्ये उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी अग्निशमन दलाची क्षमता वाढविण्यावर सरकार भर देत असल्याचे सावंत यांनी यावेळी सांगितले.

### इराण-इस्रायल युद्धाचा परिणाम, दीपिका पदुकोणचा पॅरिसमधील कार्यक्रम चुकला

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पदुकोणला नुकताच एक मोठा धक्का बसला आहे. वृत्तानुसार, इराण आणि इस्रायलमधील वाढत्या युद्ध तणावाचा परिणाम आता मनोरंजन उद्योगापर्यंत पोहोचला आहे. यामुळे दीपिकाला पॅरिसमध्ये होणाऱ्या एका विशेष आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होण्याचा तिचा बेत रद्द करावा लागला.

खरं तर, दीपिका पदुकोणला फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये होणाऱ्या एका मोठ्या फॅशन शोमध्ये भाग घ्यायचा होता. तिने या कार्यक्रमासाठी आधीच तयारी केली होती आणि तिची टीम सतत याचे नियोजन करत होती. परंतु मध्यपूर्वेतील वाढता तणाव आणि सुरक्षा कारणांमुळे अनेक विमानांवर परिणाम झाला, ज्यामुळे तिला पॅरिसला जाणे शक्य झाले नाही.

# गॅस दरवाढीविरोधात जिल्हा काँग्रेसचे आंदोलन; दर कमी करण्याची मागणी

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत वाढीव किंमती तात्काळ कमी करण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** घरगुती गॅस सिलिंडरच्या वाढत्या दरांविरोधात जिल्हा काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले. गॅस दरवाढीचा निषेध करत वाढीव किंमती तात्काळ कमी कराव्यात, अशी मागणी करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

राज्यात महागाईने कळस गाठला असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात झालेली वाढ ही सामान्य नागरिकांसाठी मोठा आर्थिक भार ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. काँग्रेसच्या काळात गॅस सिलिंडरची किंमत ४०० ते ४५० रुपयांच्या दरम्यान होती, मात्र सध्या ती ९०० ते ११०० रुपयांपर्यंत पोहोचल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

महागाई नियंत्रणात आणण्यात राज्य सरकार अपयशी ठरले असून या दरवाढीमुळे गोरगरीब कुटुंबांवर मोठा परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. वाढत्या दरांमुळे अनेक कुटुंबांना पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आल्याचेही आंदोलनकर्त्यांनी म्हटले.

यावेळी घरगुती गॅसच्या किंमती तत्काळ कमी कराव्यात, सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात गॅस उपलब्ध करून द्यावा तसेच गोरगरीब कुटुंबांना गॅसवर अधिक अनुदान द्यावे, अशा मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.







# वीज तारेच्या शॉर्टसर्किटमुळे दोन एकर गहू जळून खाक; शेतकऱ्याचा टाहो

## बेलगाव येथील घटना; पंचनामा करून तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** मेहकर तालुक्यातील बेलगाव येथे वीज लाईनच्या शॉर्टसर्किटमुळे शेतातील गव्हाचे पीक जळून खाक झाल्याची घटना गुरुवारी (दि. १२ मार्च) दुपारच्या सुमारास घडली. या आगीत शेतकरी गोपाल शंकर वानखेडे यांच्या सुमारे दोन एकर क्षेत्रातील गव्हाचे मोठे नुकसान झाले असून त्यामुळे शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोपाल वानखेडे यांनी आपल्या शेतात दोन एकर क्षेत्रात गव्हाची पेरणी केली होती. दुपारी सुमारे बारा वाजताच्या सुमारास शेतातून जाणाऱ्या वीज तारेत अचानक शॉर्टसर्किट झाल्याने ठिणग्या पडून शेतातील गव्हाच्या पिकाला आग लागली. काही क्षणातच आगीने मोठा फैलाव घेतल्याने उभे असलेले गव्हाचे पीक जळून खाक झाले.

शेतातून जाणारे वीज खांब व तारा वाकलेल्या अवस्थेत असल्यानेच शॉर्टसर्किट झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. संबंधित विभागाच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

या घटनेमुळे शेतकरी गोपाल वानखेडे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून तात्काळ पंचनामा करून शासनाकडून योग्य ती नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### ज्योत्स्ना देवधर यांच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त 'अक्षर ज्योत' सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** सुप्रसिद्ध मराठी लेखिका ज्योत्स्ना देवधर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत त्यांच्या अजरामर साहित्याचे सादरीकरण तसेच त्यांच्या आयुष्यावर आधारित निवडक गाण्यांचा 'अक्षर ज्योत' सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.'अक्षर ज्योत' सांस्कृतिक कार्यक्रम मेला शुक्रवारी १३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता पु. ल. देशपांडे सभागृह, लोकमान्य सेवा संघ (टिळक मंदिर), विलेपार्ले (पूर्व) येथे होणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.या कार्यक्रमासाठी पुष्कर श्रोत्री, मधुरा वेलणकर आणि दिप्ती भागवत यांच्याकडून अभिवाचन तर गायक नचिकेत देसाई आणि अर्चना गोरे हे निवडक गीते सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनघा मोडक तर संहिता विकास परांजपे व दुहिता सोमण यांनी तयार केली आहे.

या कार्यक्रमाचे सादरीकरण स्वरवंती क्रिएशन्स यांचे आहे.या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी रसिकांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# डॉ करीम शेख यांना पीएचडी प्रदान; सोनोशी गावासह सिंदखेड राजा तालुक्याचे नाव उंचावले

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना :** सोनोशी (ता. सिंदखेड राजा) येथील रहिवासी डॉ.करीम शेख यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने समाजकार्य या विषयात नुकतीच विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी यापूर्वी समाजकार्य आणि मराठी या दोन्ही विषयांत नेट आणि सेट सारख्या अत्यंत कठीण राष्ट्रीय व राज्यस्तरीय पात्रता परीक्षा उत्तीर्ण करून आपले शैक्षणिक प्रभुत्व सिद्ध केले आहे. त्यांच्या या यशाने सोनोशी गावासह संपूर्ण सिंदखेड राजा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. डॉ.करिम शेख हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय घाटी जालना येथे वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक या पदावर कार्यरत आहे

त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांनी आपले मार्गदर्शक, आई-वडील, संपूर्ण परिवार आणि संपूर्ण मित्रपरिवाराला दिले आहे. त्यांच्या या विशेष कामगिरीबद्दल सोनोशी व सिंदखेड राजा परिसरातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.





## शब्दकोडे क्र. 79

आडवे शब्द

१. पूर्वी गाणीबातम्या ऐकण्यासाठी याचा वापर करीत ४. पराक्रमी ७. रामदासांचे प्रसिद्ध काव्य ११. खलाशी १२. कर्णभूषण १४. गोष्ट १५. केविलवाणा १६. पुसट, धूसर १७. असत्य १९. सुगरण पक्ष्याचे घरटे २२. भांडण २३. मर्यादा, अंत २५. वाडवडिलांनी कमावलेले २६. तल्लीन २७. मैत्रीण २८. पार्वती २९. किल्ला ३०. उलट, प्रतिकूल ३४. धनको ३६. मालिका, हार ३७. हनुमान ३८. समशेर ४०. काकुनी ४२. अफवा ४३. हुलगे ४५. सहाय्य ४६. विविध प्रकारचे ४७. लहान ५०. पाण्याचा नळ ५१. वायू ५३. सभा ५४. कोरडे, वैराण ५५. लेखणी ५७. आवड ५९. पाषाण ६१. दारूचा एक प्रकार ६२. वि.वा. शिरवाडकरांचे हे नाटक विशेष लोकप्रिय आहे ६४. चिंतन ६६. लक्ष्मी ६७. विषयांध ७२. धूळ, केर ७४. श्रावणात अनेकजण याची पूजा करतात ७७. सत्यवानाची बायको ७९. गुलामी ८०. कमी दर्जाचे ८१. नेमस्त

उभे शब्द

१. वाळू २. शिजवलेला भात ३. भूमी ५. हसण्याजोगे, पोरकट ६. रुदन ८. स्त्री ९. धार्मिक काव्याचा एक प्रकार १०. कथालेखक १२अ. पाकिट १५. दिवाळी १८. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय २०. गोफण, बेचकी २१. कमावलेले (धन) २२. घट्ट २३. आंब्याची एक जात २४. पंढरीची पायी यात्रा २६. रामायणातील प्रसिद्ध अरण्य २७. बेचव २८. एक लोकप्रिय वाङ्मायप्रकार २९. तृण ३१. कामकुचार, सुस्त ३२. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट ३३. गगन ३५. जाडसर दळलेला गहू ३६. पीछेहाट ३९. मार्गस्थ ४०. ही साखर गुलकंदात वापरतात ४१. नवरा ४३. कपटी ४४. पक्ष्यांचा समूह ४६. आवाज ४८. मऊ ४९. पूर्वज ५०. अपुरा ५२. कोल्ह्यासारखा पशू ५३. नमस्कार ५६. यथेच्छ ५८. सार्वभौम राजा ६०. चांगले ६३. एकाग्र दृष्टी ६५. भ्रतार ६७. छळ, त्रास ६८. खरेपणा ६९. रानात पसरलेली आग ७०. मत्स्य ७१. कागदकापड कापण्याचे साधन ७२. केव्हा ७३. बेकरी मालासाठी आवश्यक पदार्थ ७५. रोटीचा एक प्रकार ७६. प्राण नेणारा देव ७८. तांबूल



### शब्दकोडे क्र. 78 चे उत्तर

आडवे उत्तर

१.राजधानी ४.दरसाल ७. रामभरोसे १०.मरवा १२.महाराष्ट्र १३.नास १५.वहाण १७.रंगीत १९.नाट २०.दावा २१.समर २३.परसदार २५.तगर २७.जागा २९.अंकल ३१.टर ३२.गोडवा ३३.विचारवंत ३५.काडीमोड ३७.क्षमा ३९.रंगत ४१.पदर ४४.जगावेगळा ४६.करामत ४८.धडकणे ५०.सोने ५१.कणखर ५३.सनगर ५४.सवड ५५.वर ५६.करवत ५८.विष ५९.आळ ६०.काल ६१.नत ६३.सजविणे ६४.सणवार ७०.रंभा मेनका ७१.परमानंद ७३.सलवार ७४अ.खास ७५.चाट ७६.तार ७७.कणीदार ७८.अनमान करणे

उभे उत्तर

१.राघव २.धामण ३.नीर ५.साम ६.लहानसर ७.राष्ट्र ८.भटकंती ९.सेनानायक ११.वारंवार १४.सट १६.हावरट १८.तडतड २०.दादा २२.रजाचा गज करणे २४.सरकार २६.गवाक्ष २८.गार २९.अंतर ३०.लगत ३२.गोड ३४.कोप ३६.मोगरा ३८.मानधन ४०.गळा सोडविणे ४२.दळणवळण ४३.गत ४५.गाणे ४६.कर ४७.मखर ४९.डग ५२.खर ५३.सतत ५४.समज ५६.कल ५७.वन ५९.आसपास ६०.कारभार ६२.जोकर ६३अ.विडा ६५.वारंवार ६६.विनवणी ६७.वापस ६८.समाधान ६९.धोपटणे ७२.दख्खन ७४.लता ७४अ.खार ७५.चार

# लोणार सरोवर आणि जिजाऊ जन्मस्थळाला केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत देणार भेट

## केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांचे स्विकारले निमंत्रण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जगप्रसिद्ध लोणार सरोवर आणि राष्ट्रमाता जिजाऊंचा जन्मस्थळ असलेल्या सिंदखेडराजा या पावन भूमीला भेट देऊन, पुरातत्व विभागाची बैठक बुलडाणा जिल्हयात घेण्याची विनंती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांची भेट घेऊन आज केली. पर्यटनमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवित बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्याचे निमंत्रण स्वीकारले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथे उल्कापातामुळे निर्माण झालेले जगविख्यात सरोवर आहे .या सरोवराला नुकताच रामसर सरोवराचा दर्जाही मिळाला आहे . लोणार सरोवरातील पाण्याची पातळी वाढत चालली आहे. त्यामुळे परिसरात




असलेले पुरातन मंदिर ही जलमय झाले आहेत. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठेव जतन संदर्भात हा चिंतेचा विषय ठरला आहे. या विषयी तज्ञांना पाचारण करून संशोधन होणे गरजेचे आहे अस मत ही केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी पर्यटनमंत्र्यांसोबत चर्चा करतांना व्यक्त केले. यावेळी श्रद्धाळूच्या कुंड जल स्नान विषयावरही चर्चा केली.

पूर्वी या परिसरातील जलकुंडामध्ये श्रद्धाळूना स्नान करण्याची आणि धारातीर्थ गोमुखातून कावड यात्रेसाठी पाणी घेऊन जाण्याची मुभा होती. परंतु कोविड काळामध्ये हे क्षेत्र प्रतिबंधित करण्यात आले होते. कोविडचा काळ संपुष्टात आल्यानंतर प्रतिबंधक नियम मागे घेण्यात आली नाही हे नियम शिथिल करण्यासंदर्भात पुरातत्व विभागाला सूचना करण्याची विनंती केली.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊंचा जन्मस्थळ ही बुलढाणा जिल्ह्यातील सिदखेडराजा येथे आहे. राजे लखोजी जाधव यांचा राजवाडा व इतरही ऐतिहासिक वास्तू येथे अस्तित्वात आहे. उत्खननादरम्यान भगवान विष्णूची मूर्ती येथे मिळाली धार्मिक भावनांचा आदर करत या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून मंदिर बनविणे गरजेचे आहे . शिवाय या परिसरामध्ये ऐतिहासिक वस्तूच्या निर्माण व ऐतिहासिक वारसा टिकून ठेवण्यासाठी निधीची आवश्यकता आहे.

पर्यटन विभागाच्या माध्यमातून यासाठी निधी द्यावा. जगप्रसिद्ध लोणार सरोवर आणि ऐतिहासिक राजमाता जिजाऊ जन्मस्थळ हे दोन्हीही स्थळ पर्यटन विभागाच्या अंतर्गत येत असल्याने येथील विविध समस्यांचे निवारण करण्याच्या दृष्टिकोनातून आपण प्रत्यक्ष या स्थळांना भेटी देऊन येथेच विकासात्मक बाबीवर चर्चा करून बैठक घ्यावी अशी विनंती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज दिल्ली येथे केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांची भेट घेऊन केली व बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येऊन या दोन्ही स्थळांना भेटी देण्याचं निमंत्रण दिले. पर्यटनमंत्र्यांनीही सकारात्मकता दर्शवीत हे निमंत्रण स्वीकारले आहे.

## गोळेगाव खुर्द येथे घराला आग; शेती साहित्य जळून लाखोंचे नुकसान




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील गोळेगाव खुर्द येथे शेतकरी निनाजी सदाशिव पांडे यांच्या घराला अचानक आग लागली. या आगीत घरातील कुटार, मोटर पंप, पाइप व इतर शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले असून शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून सरपंच सुनील गव्हाळे व ग्रामस्थांनी ट्रॅक्टर टँकर आणून आग विजवून आटोक्यात आणली, तातडीने मदत केल्याने मोठा अनर्थ टळला.

## महिला गटांसाठी कृषि अवजारे बँक; ५ एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतकऱ्यांना यंत्रसामग्री सुलभ दरात उपलब्ध व्हावी, या उद्देशाने कृषि विभागामार्फत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-२ अंतर्गत गावस्तरावर कृषि अवजारे बँक हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नोंदणीकृत महिला शेतकरी गटांना कृषि यंत्रसामग्री खरेदीसाठी अनुदान देण्यात येणार आहे. इच्छुक गटांनी दि. ५ एप्रिल २०२६ पर्यंत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना रास्त दरात कृषि यंत्रसामग्री उपलब्ध व्हावी यासाठी एक गाव एक अवजारे बँक ही संकल्पना राबविण्यात येत आहे. प्रत्येक तालुक्यासाठी विशिष्ट लक्षांक निश्चित करण्यात आला असून पोकरा अंतर्गत निवड झालेल्या गावांतील महिला गटांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

या योजनेसाठी उमेद पुरस्कृत महिला बचत गट, माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ हे गट पात्र आहेत. अवजारे बँकेत बीबीएफ यंत्र, बेडमेकर, बियाणे टोकण यंत्र, भात पेरणी व कापणी यंत्रे, ट्रॅक्टर व ट्रेलर, कम्बाइन हार्वेस्टर व मळणी यंत्र, ड्रोन आधारित फवारणी यंत्र, कांदा लावणी व काढणी यंत्र इत्यादी आधुनिक कृषि यंत्रसामग्रीचा समावेश राहणार आहे.

एका गावातून एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास लाभार्थी गटाची निवड ऑनलाईन संगणकीय सोडत पद्धतीने करण्यात येईल. निवड झालेल्या गटांनी ग्राम कृषि विकास समितीचे शिफारसपत्र पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

## मुलींनी एचपीव्ही लसीकरणाचा लाभ घ्यावा– मुख्य कार्यकारी अधिकारी

### गर्भाशयाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी जिल्ह्यात लसीकरण मोहिमेला सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :**महिलांमध्ये आढळणारा गर्भाशय मुखाचा कर्करोग हा गंभीर आजार असून त्यापासून संरक्षण मिळविण्यासाठी एचपीव्ही लस अत्यंत सुरक्षित व प्रभावी असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत बुलढाणा जिल्ह्यात ८ मार्च २०२६ पासून एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेत सर्व पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलींना एचपीव्ही लस देऊन त्यांचे आरोग्य सुरक्षित करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले आहे.



या मोहिमेअंतर्गत १४ ते १५ वर्ष वयोगटातील सर्व मुलींना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळविण्यासाठी ही लस अत्यंत उपयुक्त ठरत असल्याने पालकांनी कोणतीही भीती न बाळगता आपल्या मुलींना ही लस द्यावी, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने गावपातळीवर शाळा, अंगणवाडी व शासकीय आरोग्य संस्थांमार्फत जनजागृती करण्यात येत असून लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा व अंगणवाडी सेविका सक्रियपणे कार्यरत आहेत.

पालकांनी आपल्या मुलींना जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत किंवा शाळेमध्ये आयोजित लसीकरण सत्रात नेऊन एचपीव्ही लस द्यावी व त्यांच्या आरोग्याचे भवितव्य सुरक्षित करावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. तसेच सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अफवा किंवा नकारात्मक व्हिडिओंना बळी न पडता शासनाच्या आरोग्य विभागावर विश्वास ठेवून पात्र मुलींनी एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# बेलगावात भव्य मंगल कार्यालय साकार

## अर्जुन वानखेडे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश

### माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या निधीतून २५ लाखांचा सभा मंडप; ग्रामस्थांना मोठी सुविधा

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** मेहकर तालुक्यातील बेलगाव येथे ग्रामस्थांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या भव्य मंगल कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा सरपंच पती अर्जुनराव वानखेडे यांच्या पाठपुराव्यामुळे हे काम प्रत्यक्षात साकार झाले आहे.





बेलगाव गावठाण परिसरात शासनाची मोठ्या प्रमाणात जागा होती. मात्र त्या ठिकाणी अनेक वर्षांपासून अतिक्रमण झाले होते. गावाच्या हिताचा विचार करून अर्जुनराव वानखेडे यांनी संबंधित अतिक्रमणधारकांशी संवाद साधत ही जागा ग्रामपंचायतीच्या ताब्यात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आणि या ठिकाणी भव्य मंगल कार्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला. या मंगल कार्यालयासाठी भाजपा माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या निधीतून सुमारे २५ लाख रुपयांचा सभा मंडप उभारण्यात आला आहे.

त्यामुळे आता गावातील विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच कौटुंबिक कार्यक्रमांसाठी नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. यापूर्वी गावात अशा प्रकारची सुविधा नसल्यामुळे पावसाळ्यात किंवा अन्य प्रसंगी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

मात्र आता या मंगल कार्यालयामुळे गावातील सुखदुःखाच्या कार्यक्रमांसाठी योग्य जागा उपलब्ध झाली आहे.

उद्घाटन सोहळ्यावेळी बेलगाव व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत अर्जुन वानखेडे यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

## वृत्तविशेष...

### यशवंतराव चव्हाण यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** देशाचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, सुरेश थोरात, अजिक्य गोडके, समाधान गायकवाड, तहसिलदार वृशाली केसकर यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### खेड ग्रामपंचायतीतील गैरव्यवहार प्रकरणी सरपंचांविरोधात कारवाई सुरु - मंत्री जयकुमार गोरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सातारा जिल्ह्यातील खेड ग्रामपंचायतीतील विकासकामांमध्ये झालेल्या अनियमिततेप्रकरणी सरपंचांविरोधात कारवाई सुरू करण्यात आल्याची माहिती मंत्री जयकुमार गोरे यांनी विधान परिषदेत दिली.

नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे यांनी याबाबत सूचना उपस्थित केली होती.

मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, २८ जानेवारी २०२३ रोजी करण्यात आलेल्या तपासणीत ग्रामपंचायतीतील काही विकासकामांमध्ये अनियमितता आढळून आली. त्यानंतर गट विकास अधिकाऱ्यांनी २ मार्च २०२३ रोजी विस्तार अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले. चौकशीदरम्यान ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला होता. यानंतर विकासकामांची तांत्रिक तपासणी करण्यासाठी उपअभियंत्यांच्या समितीची नियुक्ती करण्यात आली. या समितीने ५ मे २०२३ रोजी सादर केलेल्या अहवालात खेड ग्रामपंचायतीत १२ कामे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता आणि निविदा प्रक्रिया न करता करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर या प्रकरणाची फेरचौकशी करण्यात आली.

या पार्श्र्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामविकास अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. तसेच सरपंचांविरोधात ग्रामपंचायत कायद्यानुसार कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भातील प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आला असून याची पहिली सुनावणी झाली आहे. या प्रकरणाचा निर्णय नियोजित मुदतीत घेण्यासाठी विभागीय आयुक्तांना आवश्यक सूचना देण्यात येणार असून संबंधितांवर पुढील कारवाई केली जाईल असे मंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी सांगितले.

### वऱ्हाड नेणाऱ्या खासगी बसच्या अपघातात एक मृत्यू, नऊ प्रवासी गंभीर

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :**गोंदियाजवळील कारंजा इथं लग्नाचं वऱ्हाड घेऊन परत येत असताना खासगी बसचा अपघात झाला. या अपघातात सोनू घनश्याम उईके (वय २७, रा. वाडी, नागपूर) याचा मृत्यू झाला आहे. तर, बसमधील नऊ प्रवासी गंभीर जखमी आहेत. गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील चोपा मोहाडी इथल्या वरखडे कुटुंबीयांचं वऱ्हाड खासगी बसमधून मध्य प्रदेश राज्यातील बालाघाट जिल्ह्यातील खैरलांजी मैकेपार इथं गेलं होतं. तिथं लग्न सोहळा पार पाडून वऱ्हाड रात्री परत येत असताना पहाटेच्या दरम्यान गोंदिया जवळील कारंजा इथं खासगी बसचा अपघात झाला. रस्त्यावरील एका वाहनाला ओव्हरटेक करत धडक दिली. यानंतर खासगी बस चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यामुळं बस रस्त्याच्याकडेला असलेल्या झाडाझुडपात शिरली. परंतु, बसचा वेग अधिक असल्यामुळं बस तिथं असलेल्या झाडांना धडक देत आत शिरली. त्यामुळं खासगी बसचं मोठं नुकसान झालं. यानंतर खासगी बस चालकानं घटनास्थळावरून पळ काढला.

अपघाताचा पोलीस तपास सुरू : खासगी बसनं झाडाझुडपातील झाडांना धडक दिल्यामुळं बससमोरील काच फुटली. या बसमधून महिला, पुरुष आणि लहान मुलं प्रवास करत होते. या घटनेनंतर बसमधील काही पुरुषांनी खिडकीतून लोकांना बाहेर काढलं. या अपघातात सोनू घनश्याम उईके (वय २७, रा. वाडी, नागपूर) यांचा मृत्यू झाला आहे. तर बसमधील नऊ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमी प्रवाशांना उपचारासाठी नजीकच्या रूग्णालयात दाखल केलं आहे. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य राबवलं. सध्या या अपघाताचा पोलीस तपास सुरू आहे.